नि.फौ.ख.क्र. ३८७ / २०२३

निशाणी क्र. ४३

<u>साक्षीदार क्र. ४ चा शपथेवर जबाब</u>

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – प्रितम शिवनारायण जेथळे

वय सुमारे – ४० वर्षे, उपजिवीका – व्यवसाय

राहणार – बेलापुर रोड, ता.श्रीरामपूर.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. पी. आर. धुमाळ यांचे मार्फत.</u>**

**१.** माझे पादत्राणाचे दुकान आहे. माझे दुकान श्रीरामपूर मेन रोडला केशर प्रेम मार्केट मध्ये आहे. माझ्या दुकानाचे नाव ' फेंन्डस् शु पॅलेस' असे आहे. माझ्या दुकानात बरेच लोकं खरेदीसाठी येत असतात. घटनेच्या दिवशी म्हणजेच दिनांक ०९.१०.२०२२ रोजी महेंद्र पटारे ग्राहक म्हणुन आले होते. महेंद्र पटारे याने माझ्या दुकानात खरेदी केली होती का हे मला आठवत नाही. महेंद्र पटारे यांना कुठे जायचे आहे याबाबत चर्चा माझ्याशी झाली नाही. दिपक पटारे माझ्या दुकानात त्या दिवशी आले नव्हते. पोलिसांनी मला तालुका पोलिसठाण्यात जबाबासाठी बोलाविले नव्हते.

**<u>टीप- साक्षीदार सरकार पक्षाच्या कथनाला समर्थन करत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी साक्षीदाराची उलट तपास करण्याची परवानगी मागितली. सरकारी पक्षाला उलटतपासात विचारण्यात येणारे प्रश्न तसेच फौजदारी दंड प्रक्रीया कलम १६२ अंतर्गत प्रश्न विचारण्याची परवानगी देणेत येत आहे.</u>**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की दिनांक ०९.१०.२०२२ रोजी मी दुकानात बसलो असता कारेगावचे दिपक पटारे व महेंद्र पटारे दुपारी १.०० वा. दुकानात आले होते.हे म्हणणे खरे आहे की, दिपक पटारे व महेंद्र पटारे हे माझ्या दुकानात कायम येत असतात म्हणुन त्यांची व माझी ओळख आहे.

**प्रश्न –** त्या दिवशी दिपक पटारे व महेंद्र पटारे यांनी तुम्हाला पादत्राणे दाखविण्यास सांगितले ?

**उत्तर –** ग्राहक म्हणुन ते असतात, त्या दिवशी नक्की त्यांनी पादत्राणे घेतले हे मला सांगता येणार नाही.

**प्रश्न –** त्या दिवशी महेंद्र पटारे यांनी तुमच्या दुकानातुन दोन पादत्राणे घेतले व तशी तुम्ही पावती दिली ?

**उत्तर –** ते नेहमीच येत असतात, ग्राहक म्हणुन दिली असेल.

०३. हे म्हणणे खरे नाही की दिपक पटारे मला बोलले की' माझ्या भाचीचे लग्न आहे, कपडे खरेदी करायचे आहे व आम्हाला सद्गुरु मंगल कार्यालय येथे जायचे आहे' व असे म्हणुन ते पादत्राणे खरेदी करुन कपडयांच्या दुकानात गेले. हे म्हणणे खरे नाही की पोलिस उपनिरीक्षक ए. आर. बोरसे यांनी मला पोलिसठाण्यात जबाब देण्यासाठी बोलाविले.

**उलटतपास आरोपीं तर्फे विधीज्ञ श्री.पी. बी. औताडे यांच्या तर्फे नाकारला.**

**श्रवणोत्तर स्वीकृती....**

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2026.01.14 15:12:12 +0530

**(व्ही.एन.काटकर)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**न्यायालय क्र.४, श्रीरामपूर.**

**दिनांक–१४.०१.२०२६**